# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P)२३३४७६९(O)Fax-२३५६८२०

http://www.dteau.orgEmail-roaurangabad.dte@gmail.com

**तात्काळ** /कालमर्यादा

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१७/२०३०

दिनांक :- 2 JUN 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद

शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद/जालना/अंबड/बीड/

उस्मानाबाद/पु.ला.लातुर/शा.नि.म.तं.लातुर/नांदेड/हिंगोली/

जिंतुर

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शिबीरे/कार्यशाळा आयोजीत करण्याबाबत..**

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१७/४७१ दिनांक १२/०५/२०१७

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, व तंत्रनिकेतने अभ्यासक्रमाच्या संस्थां प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, प्रवेश नियामक प्राधिकरणा अंतर्गत राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचेस्तरावरून मागील वर्षा पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेचे कामकाज पार पाडले जाते.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश नियम शासनाने दिनांक २४/०४/२०१७ रोजी राजपत्रान्वये प्रसिध्द केले असून ते संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्या प्रवेश नियामांचे अभ्यासक्रमनिहाय सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार व त्यांचे पालक यांना योग्य प्रकारे आकलन व्हावे व प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेताना विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम किंवा संदिग्धता राहू नये या दृष्टीने प्रवेश नियमाबदलचे योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी संस्थांकडून शिबिरे आयोजित करण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

या पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात होणा-या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या संचालनालयाच्या पत्रात नमुद केल्यानुसार कार्यशाळा/मार्गदर्शन शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करण्यात यावे. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सादर.

२. प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २अ/एडीएम/२०१७/ ४७१

दिनांक : 12 MAY 2017

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे , नाशिक, औरंगाबाद, अमरावती , नागपुर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने शिबीरे / कार्यशाळा आयोजीत करण्याबाबत.

प्रवेश नियामक प्राधिकरणा अंतर्गत राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे स्तरावरुन मागील वर्षा पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे कामकाज पार पाडले जात असले तरी प्रत्यक्षात त्यासाठी नोडल ऑफीसर म्हणून तंत्रशिक्षण संचालनालयाचे स्तरावरुन प्रवेशाची कार्यवाही केली जाते.

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश नियम शासनाने दिनांक २४.४.२०१७ रोजी राजपत्रान्वये प्रसिध्द केले असून ते संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्या प्रवेश नियमांचे अभ्यासक्रमनिहाय सर्व प्रवेशोच्छुक उमेदवार व त्यांचे पालक यांना योग्य प्रकारे आकलन व्हावे व प्रवेश प्रक्रियेमध्ये भाग घेताना विद्यार्थी आणि पालकांमध्ये संभ्रम किंवा संदिग्धता राहू नये या दृष्टीने या प्रवेश नियमाबद्दलचे योग्य ते मार्गदर्शन विद्यार्थ्यांना होण्याच्या दृष्टीने मोठया प्रमाणात शिबिरे आयोजित करण्यात यावीत.

सदर कार्यशाळा / मार्गदर्शन शिबीरात साधारणपणे खालील बांबीवर उपापोह करण्यात यावा.

१. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज करण्याची सर्वसाधारण प्रक्रिया -- यामध्ये अंतिम मुदतीनंतर प्राप्त अर्जदारांचा विचार फक्त संस्थास्तरावरील कोटा तसेच केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेलया जागांवर संस्थांकडून केलया जाणा-या प्रवेशासाठी होणार आहे ही बाब ठळकपणे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

२. मागील वर्षीचे प्रवेश नियम / प्रवेश प्रक्रिया व या वर्षीचे प्रवेश नियम / प्रवेश प्रक्रियेमध्ये असलेले ठळक बदल प्रकर्षाने निदर्शनास आणावेत-- उदाहरणार्थ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रवेश फे-या चार ऐवजी तीन झालेल्या आहेत, All India Quota साठी CET ऐवजी JEE (Mains)स्कोअरला प्राधान्य असणार आहे इत्यादी.

३. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी अधिसूचीत समक्ष प्राधिकरणाची कार्यकक्षा.

४. विविध व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश पात्रतेचे निकष.

५. विविध प्रवर्गासाठी असलेल्या राखीव जागांचे प्रमाण व त्यासाठी आवश्यक कागदपत्रे.

सहसंचालक, तंत्रशिक्षण

वि.क्र.

आवक क्र 1337

दिनांक 20 MAY 2017

६. अखिल भारतीय स्तरावरील व राज्याअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी निर्धारीत केलेल्या जागांची टक्केवारी.
७. एनआरआय व ओसीआय इत्यादीसाठी प्रवेश पात्रतेचे नियम.
८. केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी व संस्था अंतर्गत प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये अर्ज करण्याचा अनिवार्यता.
९. दुस-या व तदनंतरच्या फेरीसाठी Option Form भरण्याची किंवा पूर्वीचे Option Retain करण्याची मुभा.
१०.Option Form भरणे व Allotment नंतर रिपोर्टींग करताना Float, Freez , Slide ची प्रक्रिया व प्रवेश निश्चिती शूल्क भरण्याची प्रक्रिया.
११.मुळ कागदपत्राची पडताळणी करण्याचे अनिवार्य काम व FC Center आणि ARC ची भूमिका व त्यांचे स्तरावर केली जाणारी प्रक्रिया.
१२.प्रवेश प्रक्रियेसाठी आवश्यक असणारी प्रमाणपत्रे, त्यांची विहीत प्रपत्रे व त्यांची जुळवाजुळव.
१३.प्रवेश रदद करण्याची व प्रवेश शुल्क परत मिळण्यासंबंधीचे सर्वसाधारण नियम.
१४.प्रवेशाच्या कट-ऑफ दिनांकाचे महत्व .
१५.सामायीक प्रवेश परीक्षा व केन्द्रीभूत प्रवेश प्रक्रियेशी निगडीत आनूषंगिक इतर महत्वाच्या बाबी व ठळक वैशिष्टये.

उपरोक्त मुददे व अनुषंगिक बाबीवर समुपदेशन /मार्गदर्शन करतांना विशेष करुन ग्रामीण भागातील स्थानिक शैक्षणिक पार्श्वभूमी व विद्यार्थी / पालकांमधील जागरुकतेचा एकूण विचार करुन आवश्यक आणखी काही बाबींचा समावेश स्थानिक गरजेनुसार करण्यात यावा. सदर मार्गदर्शन शिबीराचे आयोजन त्या-त्या जिल्हयातील व आवश्यकता असल्यास तालुक्यात किमान एका ठिकाणी करण्यात यावे. प्रवेश प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रियेला लवकरच सुरूवात होणार आहे त्यामुळे पुढील तीन आठवडयाचे कालावधीत सदर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन आपल्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील जिल्हयात व तालुकास्तरावर करण्यात यावे.

तसेच सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय कार्यालयामध्ये एका समुपदेशन कक्षाची स्थापन करण्यात यावी. त्या कक्षामंध्ये जाणकार व संगणक प्रणालीचे ज्ञान असणा-या अधिका-यांची नेमणूक करून त्या कक्षामार्फत विद्यार्थ्यांना प्रवेशासंबंधी आणि प्रवेश प्रक्रियेसंबधी अद्ययावत माहिती देण्याची कार्यवाही करण्यात यावी. समुपदेशन कक्ष स्थापन केल्याची व त्या कक्षाचे संपर्कासाठीचे दूरध्वनी क्रमांक प्रसिध्द करण्यात यावेत जेणेकरून प्रवेशोच्छुक विद्यार्थी आणि पालकांना प्रवेशासंबंधी अडचणी येणार नाहीत.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत. मा. आयुक्त, राज्य सामायीक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

E:\Budage\२०१७-१८\General Correspondence\workshop for admission process MAY २०१७.docx